**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि युनायटेड किंग्डम नैसर्गिकरीत्या भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- भारत आणि युकेच्या प्रधानमंत्र्यांची मुंबईत द्विपक्षीय चर्चा

- इस्त्राइल आणि हमास दरम्यान शांतता कराराच्या पहिल्या टप्प्यावर सहमती झाल्याची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची घोषणा

- बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गैरवापराबद्दल निवडणूक आयोगाचा इशारा

**आणि**

- खोकल्याच्या औषधामुळे बालकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित औषध उत्पादकाला अटक

**<><><><><>**

भारत आणि युनायटेड किंग्डम नैसर्गिकरीत्या भागीदार असून लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचं राज्य या मूल्यांवरचा विश्वास हा या भागीदारीचा पाया असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. मुंबईत आज युकेचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांच्याशी प्रतिनिधी मंडळस्तरावर चर्चा झाल्यानंतर ते संयुक्तपणे पत्रकारांना संबोधित करत होते. …

**होल्ड- प्रधानमंत्री**

ब्रिटनच्या प्रधानमंत्र्यांचा भारत दौरा हा दोन्ही देशातल्या भागीदारीतल्या व्यापक दृष्टी आणि ऊर्जेचं प्रतीक असून ही भागीदारी जागतिक स्थैर्य आणि आर्थिक प्रगतीचा आधार बनेल, असा विश्वास प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्यक्त

केला. अलिकडेच भारत-ब्रिटन दरम्यान झालेल्या मुक्त व्यापार करारामुळे दोन्ही देशांचा व्यापार वाढेल तसंच रोजगाराच्या संधी निर्माण होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले. स्टार्मर यांच्यासोबत इंडो-पॅसिफीक क्षेत्रात शांतता प्रस्थापित करणं, युक्रेन-रशिया आणि गाझापट्टीतील संघर्ष थांबवण्याबाबत चर्चा झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी सांगितलं युक्रेन-रशिया आणि गाझातील संघर्षावर शांततापूर्ण मार्गाने तोडगा काढावा यासाठी भारताचा पाठिंबा असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांचं आज मुंबईत राजभवन इथं स्वागत केलं. या बैठकीनंतर प्रधानमंत्री मोदी आणि कीर स्टार्मर सीईओ फोरमला उपस्थित राहतील तसंच विविध उद्योगांच्या प्रमुखांशी भारत-ब्रिटन आर्थिक आणि व्यापार करारावर चर्चा करतील. त्यानंतर दोन्ही नेते ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये सहभागी होतील आणि उपस्थितांना संबोधित करतील. दरम्यान, कीर स्टार्मर यांनी काल विविध उद्योजकांशी संवाद साधला. भारत आणि ब्रिटन मुक्त व्यापार करार हा युरोपियन महासंघातून बाहेर पडल्यानंतर ब्रिटनने स्वाक्षरी केलेला सर्वात मोठा करार असल्याचं स्टार्मर उद्योजकांना संबोधित करताना म्हणाले. स्टार्मर यांनी काल यशराज फिल्म्स स्टुडिओलाही भेट दिली. पुढच्या वर्षी यशराज फिल्म्सच्या ३ चित्रपटांचं ब्रिटनमध्ये छायाचित्रण होणार आहे. यामुळं ब्रिटनच्या अर्थव्यवस्थेत लाखो पौंडांची भर पडेल आणि ३ हजार रोजगार निर्माण होतील, असं स्टार्मर म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या आर्थिक तत्रज्ञान कंपन्यांनी डिजिटल साक्षरतेत कमी पडणाऱ्या नागरिकांना तसंच वरिष्ठ नागरिकांनाही सहज वापरता येतील अशा प्रकारची उत्पादनं आणि सेवा सादर कराव्यात असं आवाहन रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी केलं आहे. मुंबईत सुरु असलेल्या ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२५ मध्ये ते काल बोलत होते. सायबर गुन्हेगारीला आळा घालुन माहितीचं संरक्षण

तसेच ग्राहकांच्या सुरक्षिततेसाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचं ते म्हणाले. देशात सध्या १० हजार हुन जास्त फिनटेक कंपन्या असून जगभरातल्या गुंतवणूकदारांसाठी या क्षेत्रात संधी उपलब्ध असल्याचं त्यांनी म्हटलं.

**<><><><>**

इस्त्राइल आणि हमास यांच्यात संघर्षविरामाबाबत तसंच ओलिसांची सुटका करण्यासाठीही सहमती झाली असल्याची घोषणा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केली आहे. अमेरिकेच्या मध्यस्थीने आखलेल्या शांतता योजने अंतर्गत इस्त्रायल आणि हमासमध्ये ही सहमती झाली आहे.  इजिप्तमधे शर्म अल-शेख इथं झालेल्या वाटाघाटींनंतर ट्रम्प यांनी ही घोषणा केली. शांतता कराराच्या पहिल्या टप्प्यात हमासने ताब्यात घेतलेल्या सर्व उर्वरित ओलिसांची सुटका केली जाणार असून इस्त्राइल गाझामधून टप्प्याटप्प्याने सैन्य माघारी घेणार आहे. इस्त्रायली अधिकारी, हमास आणि मध्यस्थ असलेल्या कतारनं गाझा शांतता कराराच्या पहिल्या टप्प्याला दुजोरा दिला आहे. इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी या घोषणेचं स्वागत केलं असून हा इस्त्रायलसाठी हा महत्त्वाचा दिवस असल्याचं म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या सहमतीचं स्वागत केलं आहे. या समझोत्यामुळे पशचिम आशियात शांतता प्रस्थापित होईल असा विश्वास त्यांनी समाजमाध्यमावर व्यक्त केला आहे.

**<><><><>**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज  ऑस्ट्रेलियाची राजधानी कॅनबेरा इथे ऑस्ट्रेलियाचे उपप्रधानमंत्री आणि संरक्षणमंत्री रिचर्ड मार्लेस यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा केली.  यात संरक्षण उद्योग, सायबर सुरक्षा, सागरी सुरक्षा आणि क्षेत्रीय आव्हानं या मुद्द्यांचा  समावेश होता. ऑस्ट्रेलियाने सीमापार दहशतवादाच्या मुद्द्यावर भारताला दिलेल्या पाठिंब्याबद्दल राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावर

आभार मानले आहेत. दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत अनेक महत्त्वाच्या संरक्षणविषयक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या.

<><><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात विरोधातल्या उमेदवाराला  लक्ष्य बनवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करु नये असे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. आदर्श आचारसंहितेत या निर्देशांचा समावेश केला आहे. समाजमाध्यमांवर चुकीची, बनावट आणि दिशाभूल करणारी माहिती कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने देण्यावर बंदी घातली आहे. प्रचारातल्या चित्र, चित्रफीत अथवा ध्वनिफितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केला असल्यास तसं लेबल त्यावर लावणं आवश्यक आहे. समाजमाध्यमावर सक्रीय असणाऱ्यांमुळे निवडणुकीचं वातावरण बिघडू नये याकरता कडक नजर ठेवण्यात येईल, असं आयोगाने स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

खोकल्याच्या औषधामुळे बालकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी संबंधित औषध उत्पादकाला अटक केली आहे. मध्यप्रदेश पोलिसांच्या विशेष तपास पथकाने तामिळनाडूत कांचीपुरम इथं आज सकाळी   ही कारवाई केली. या औषधाच्या सेवनामुळे  मध्यप्रदेश आणि राजस्थानातल्या अनेक बालकांचा मृत्यू झाल्याचा संशय आहे. तपास अधिकाऱ्यांनी श्रीशन फार्मा या औषध कंपनीच्या कारखान्यावर छापे टाकून काही नमुने आणि कागदपत्रं ताब्यात घेतली असून कारखाना सील केला आहे.

<><><><><>

पंजाब पोलिसांनी आज बब्बर खालसा इंटरनॅशनल या संघटनेच्या दोन दहशतवाद्यांना अडीच किलो आरडीएक्ससह अटक केली. गुरजींदर सिंग आणि दिवाण सिंग अशी त्यांची नावं आहेत. ब्रिटनमधे राहणारा हरविंदर सिंग रिंदा हा या

दहशतवादी संघटनेचा म्होरक्या आहे. या स्फोटकांचा वापर दहशतवादी कारवायांसाठी केला जाणार होता असं प्राथमिक तपासात उघड झालं आहे. याच आठवड्यात अमृतसर इथून चार हँडग्रॅनेड जप्त करण्यात आली होती. ही स्फोटकं पाकिस्तानी गुप्तचर संस्था आयएसआयने पाठवल्याचा संशय आहे.

<><><><><>

मुंबई मेट्रो ३ चा आचार्य अत्रे चौक ते कफ परेड दरम्यानचा अखेरचा टप्पा आज सकाळपासून प्रवाशांसाठी खुला झाला आहे. त्यामुळे आता प्रवाशांना आरे जेव्हीएलआर या उपनगरातल्या मेट्रो स्थानकापासून ते कफ परेड असा संपूर्ण प्रवास करता येणार आहे. या मेट्रोसेवेचं नाव ॲक्वा लाईन असं आहे. आज सकाळी पाच वाजून ५५ मिनिटांनी जाणारी आणि येणारी पहिली मेट्रो आरे आणि कफ परेड अशा दोन्ही स्थानकांतून रवाना झाली. तर रात्री साडे दहा वाजता शेवटची मेट्रो असेल. काल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मेट्रो ३च्या अखेरच्या टप्प्याचं उद्घाटन करण्यात आलं होतं.

<><><><><>

पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत आंध्र प्रदेशातल्या ग्रामीण स्थानिक स्वराज संस्थांसाठी चालू आर्थिक वर्षातलं  अनुदान केंद्र सरकारने आज जारी केलं. अनुदानाचा चार हजार कोटी रुपयांचा पहिला हप्ता वितरित झाल्याचं पंचायत राज मंत्रालयानं सांगितलं. या अनुदानाचा फायदा १३ जिल्हा परिषद, ६५० पंचायत समिती आणि १३ हजाराहून जास्त ग्रामपंचायतींना होईल, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

महिला क्रिकेट मधे ट्वेंटीट्वेंटी  विश्व चषक स्पर्धेत आज भारताचा सामना दक्षिण आफ्रिकेशी होणार आहे. विशाखापट्टणम् इथं दुपारी तीन वाजता सामना सुरू होईल. या स्पर्धेत सलग दोन सामने भारतानं जिंकले आहेत. या स्पर्धेत काल

झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं पाकिस्तानचा १०७ धावांनी पराभव केला. ऑस्ट्रेलियानं दिलेल्या २२२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानचा संघ ३७ व्या षटकापर्यंत केवळ ११४ धावाच करू शकला.

<><><><><>

फिनलंड मधल्या अस्पु इथे सुरु असलेल्या आर्क्टिक खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुषांच्या एकेरी गटात भारताच्या थरून मन्नेपल्ली याने  फ्रान्सच्या टोमा जुनियर पोपोव्ह चा पराभव करून उपउपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

//<><><><><>//